## ना-हरकत पत्र

जा.क्र.अपोआ/वाह/नियोजन/4623 /पुणे/२०२०
अपर पोलीस आयुक्त, वाहतूक यांचे कार्या.
पुणे दिनांक :- 14/०६/२०२०
07

प्रति,

अधिक्षक अभियंता
पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे

संदर्भ :- आपलेकडील पत्र जा क्र ईजी/मेला-३/०७.२०/प्र.क्र.२६१/३९९ /शाखा-१ पुणे दि १३/७/२०२०

विषय :- पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हिंजवडी ते शिवाजीनगर मेट्रो लाईन प्रकल्पच्या मार्गिकेमध्ये येत असलेल्या सावित्रीबाई फुले विद्यापीठ येथील पुल पाडणेचे काम करण्यास वाहतुक शाखेची परवानगी बाबत....

------ooo------

उपरोक्त विषय व संदर्भान्वये आपणांस सावित्रीबाई फुले विद्यापीठ व इ-स्केअर चौकातील अस्तित्वातील एकेरी वाहतुकीचे दोन उडडाणपुल पाडून त्या ठिकाणी नवीन आराखडयानुसार एकात्मिक दुमजली उड्डाणपुल बांधण्यासाठी महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २६/५/२०२० चे पत्रानुसार परवानगी देण्यात आलेली असुन सादर कामाकरीता वाहतूक शाखेची परवानगी मिळणेबाबतच पत्र या कार्यालयास प्राप्त झाले आहे.

सदर कामाअंतर्गत सावित्रीबाई फुले विद्यापीठ व इ-स्केअर चौकातील अस्तित्वातील एकेरी वाहतुकीचे दोन उडडाणपुल पाडून त्या ठिकाणी नवीन आराखडयानुसार एकात्मिक दुमजली उड्डाणपुल बांधण्यासाठी अधिक्षक अभियंता पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण पुणे याना वाहतूक शाखेचे ना-हरकत देण्यात येत आहे.

अटी :-

१. कामाच्या नियोजनासाठी संबंधित वाहतूक विभागाचे प्रभारी अधिकारी यांचेशी आगाऊ संपर्क साधावा.
२. सदरचे काम करतांना, वाहतूकीस व पादचाऱ्यांना कोणत्याही प्रकारचा अडथळा होणार नाही याबाबत दक्षता घेण्यात यावी.
३. आवश्यक ठिकाणी कामाबाबत पुर्व सुचना देणारे फलक, वाहतूक डायव्हर्शन बाबतचे फलक व कॉन्ट्रक्टरचे नाव, पत्ता व फोन नंबर व कामाचा कालावधीबाबतचे फलक लावावेत.
४. काम चालू असतांना कोणताही कामगार फ्लोरोसेंट जॅकेट शिवाय काम करणार नाही, याची दक्षता घ्यावी.
५. हे काम सुरु असताना, अपघात टाळणेसाठी योग्य ती सर्व प्रकारची खबरदारी घ्यावी.
६. सदर ठिकाणचे कामासाठी वापरण्यात येणाऱ्या मशिनरी व वाहनांमुळे वाहतूकीस अडथळा होणार नाही, याची दक्षता घ्यावी.
७. सदर ठिकाणी खोदाई काम करताना, सदर कामाचा राडारोडा किंवा कच्चा माल कोणत्याही परिस्थितीत वाहतूकीच्या रस्त्यावर येणार नाही. याची दक्षता घ्यावी.
८. कामाचे ठिकाणी लोखंडी बॅरिकेटस् लावून त्यावर रेडीयमचे पट्टे, आवश्यक ते रेडीयम फलक लावावेत.

(कृ.मागे पहा)

९. सदरचे काम हे दिवसा व रात्री करण्यात येणार असल्यास, रात्रीचे वेळी कामाचे ठिकाणी पुरेशा प्रमाणात लाईटची व्यवस्था करावी.

१०. रोड क्रॉसिंगचे काम हे रात्रीचे वेळी करण्यात यावे.

११. सदर कामाचे ठिकाणी कॉन्ट्रॅक्टर यांनचेतर्फे वॉर्डन्स नेमण्यात यावेत व ते वाहतूक नियोजनाचे काम करतील.

१२. सदरचे काम चालू असताना कामामुळे अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदार यांची राहील.

१३. नागरीकांच्या तक्रारी आलेस सदरचे ना-हरकत पत्र रद्द करण्यात येईल.

१४. सदर कामासाठी इतर विभागाच्या आवश्यक त्या परवानग्या घेण्यात याव्यात.

१५. वरील नमूद अटींचा भंग झालेचे आढळलेस तात्काळ ना-हरकत पत्र रद्द करण्यात येवून संबंधीतांवर इं.पि.को. कलम २८३, २९१ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

१६. **वरील नमुद अटीं पैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन केल्यास किंवा ठरल्याप्रमाणे वाहतूक नियोजन न केल्यामुळे वाहतूकीची कोंडी होत असल्याचे निदर्शनास आल्यास हे ना-हरकत पत्र रद्द करण्यात येईल तसेच जो पर्यंत पुरेसा रस्ता वाहतूकीसाठी उपलब्ध करुन दिला जाणार नाही, तोपर्यंत काम सुरु करता येणार नाही.**

१७. सदरचे ना-हरकत पत्र हे दि. १४/०७/२०२० पासुन दि. २३/७/२०२० या कालावधीकरीता वैध राहील.

(सुरेंद्रनाथ देशमुख)
सहा.पोलीस आयुक्त,
व्यवस्थापन व समन्वय
वाहतूक , पुणे शहर

प्रत योग्य त्या कार्यवाहीस्तव:- सपोआ वाहतूक परि. ३/ प्रभारी अधिकारी चतु:श्रुंगी पुणे शहर

सदर ठिकाणी पाहणी करुन संबंधित ठेकेदार यांनी काम सुरु करणेपुर्वी तसेच काम सुरु केलेनंतर ना-हरकत पत्रामध्ये नमुद केलेल्या सर्व अटींची त्याचप्रमाणे या कार्यालयाकडून देण्यात आलेल्या चेकलिस्टमधील मुद्यांची पुर्तता केली आहे काय? याबाबत वेळोवेळी प्रत्यक्ष खात्री करावी.

ना-हरकत पत्रामध्ये नमुद अटींची तसेच चेकलिस्ट मधील मुद्यांची पुर्तता केली नसल्याचे आढळल्या किंवा ना-हरकत पत्रामध्ये नमुद ठिकाणचे कामाव्यतिरिक्त इतर ठिकाणी काम सुरु केल्याचे आढळून आल्या सदरचे काम बंद करुन संबंधित ठेकेदार यांचेवर कारवाई करुन त्याबाबतचा अहवाल इकडील कार्यालयास सा करावा.